
16 FEB 2026
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सूर्यप्रतापी राजा शिवछत्रपती, तेज तुझे अमर दिव्य ज्योती...



मकरसंक्रांतीपासून सूर्याचे उत्तरायण सुरू आहे. या उत्तरायण प्रवासादरम्यान कोल्हापुरात शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य अश्वारूढ पुतळ्याच्या पाठी मावळतीच्या सूर्याने तेजांकित प्रभामंडळ प्रदान केले आहे.

छाया : डॉ. आलोक जत्राटकर

नवराष्ट्र 16 FEB 2026
Paschim Maharashtra | 16 February 2026 | Page 4

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# युवा महोत्सवात 'शिवाजी'चे यश



▶ कोल्हापूर, (श. प्र.) भारतीय विश्वविद्यालय संघ, नवी दिल्लीमार्फत आयोजित दक्षिण-पश्चिम विभागीय युवा महोत्सव जेएसएस अॅकॅडमी ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च, श्री शिवरात्रीश्वरा नगर, म्हैसूर (कर्नाटक) येथे आयोजित करण्यात आला होता. या युवा महोत्सवात शिवाजी विद्यापीठाचा एकूण ६० सदस्यांचा संघ सहभागी झाला होता. या स्पर्धेत संघाने चांगले यश संपादन केले. विद्यापीठ प्रशासनाकडून यशस्वी कलाकारांचे अभिनंदन करण्यात आले.

कला विभाग सर्वसाधारण विजेतेपद व सर्वसाधारण उपविजेतेपद विद्यापीठास प्राप्त झाले. हा युवा महोत्सव विद्यापीठ संघास प्रभारी कुलगुरु प्रा.डॉ.सुरेश गोसावी, प्रभारी प्र-कुलगुरु प्रा.डॉ.ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. विद्यापीठ संघासोबत डॉ.रघुनाथ ढमकले, व्यवस्थापन परिषद सदस्य, डॉ.टी. एम. चौगले संचालक, विद्यार्थी विकास हे उपस्थित होते. तसेच शिवाजी विद्यापीठ संघासाठी संघव्यवस्थापक म्हणून डॉ.ए.एस.बल्लाळ, आजरा महाविद्यालय, आजरा व प्रा. डॉ. शिला मोहिते, मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महाविद्यालय, कडेगाव. जि. सांगली यांनी काम पाहिले.

16 FEB 2026

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भुयारी मार्गाला गेलेले तडे धोकादायक नाहीत

## बांधकाम विभागाकडून तांत्रिक तपासणी सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ परिसरातील मुख्य इमारत व समोरच्या विभागांना जोडण्यासाठी उभारलेल्या भुयारी मार्गाच्या वरच्या रस्त्याला तडे जाऊ लागल्याने सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आल्याच्या 'लोकमत'ने दिलेल्या बातमीनंतर विद्यापीठाने सार्वजनिक बांधकाम विभागाकडे याचा खुलासा मागविला. त्यांनी या रस्त्याला गेलेले तडे संरचनात्मकदृष्ट्या धोकादायक नसल्याचा खुलासा केला आहे. दरम्यान, याची तांत्रिक तपासणी सुरू केल्याची माहितीही त्यांनी दिली.

विद्यापीठाच्या पूर्व व पश्चिम भागास कायमस्वरूपी जोडण्यासाठी बांधलेल्या भुयारी मार्गाला तडे गेल्याचे वृत्त शुक्रवारी 'लोकमत'मध्ये प्रसिद्ध झाले. त्यानंतर विद्यापीठाच्या स्थापत्य शाखेच्या कुलसचिवांकडून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या इमारत प्रकल्प उपविभागाकडे खुलासा मागविला. १७ नोव्हेंबर २०२३ रोजी विद्यापीठाशी झालेल्या निविदा करारानुसार या कामासाठी कंत्राटदारावर १० वर्षांचा डिफीट लायबिलिटी पिरीयड लागू आहे. त्यामुळे दुरुस्तीची कार्यवाही संबंधित कंत्राटदारामार्फत करण्यात येणार आहे. तांत्रिक तपासणी सुरू असून उपाय-योजना करण्यात येईल, असा खुलासा बांधकाम विभागाने केला आहे.

### पाणी सुकल्याचा परिणाम

काँक्रीट वा सिमेंटच्या प्लास्टरमधील ओलावा कमी झाल्यामुळे निर्माण होणाऱ्या भेगांना 'आकुंचन भेगा' म्हणतात. पाणी सुकल्यावर काँक्रीटचे आकारमान कमी होते, ज्यामुळे पृष्ठभागावर ताण निर्माण होऊन बारीक तडे जातात. हे प्रामुख्याने चुकीचे क्युरिंग, जास्त पाणी किंवा लवकर सुकल्यामुळे घडते.

"

**यासंदर्भात संबंधित विभागाने शुक्रवारी प्रत्यक्ष पाहणी केली. त्यानुसार रस्त्याच्या पृष्ठभागावर आढळलेल्या या आकुंचन भेगा असून संरचनात्मकदृष्ट्या कोणताही धोका आढळलेला नाही.**

**हेमा ए. जोशी**, उपविभागीय अभियंता, इमारत प्रकल्प उपविभाग, कोल्हापूर

16 FEB 2026
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आज अतुल देऊळगावकर यांचे विशेष व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनात ज्येष्ठ पर्यावरण अभ्यासक अतुल देऊळगावकर यांचे सोमवारी (दि. १६) सकाळी ११ वाजता 'साहित्य, संस्कृती, विज्ञान, माध्यमे आणि शाश्वत विकास' या विषयावर विशेष व्याख्यान होणार आहे.

विद्यापीठ हिंदी विभाग, किर्लोस्कर ऑईल इंजिन व लक्ष्मी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम होत आहे. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे असणार आहेत. याप्रसंगी हिंदी विभागाच्या प्रभारी प्रमुख प्रा. डॉ. तृप्ती करेकट्टी, अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, सामाजिक बांधिलकी अधिकारी शरद आजगेकर व विनायक देसाई उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून, सहभागी होण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे.

16 FEB 2026
सकाळ



कोल्हापूर : शहाजी महाविद्यालयात बॉडी बिल्डिंग स्पर्धेस प्रतिसाद मिळाला.

# शहाजी महाविद्यालयात शरीरसौष्ठव स्पर्धा

कोल्हापूर, ता. १५ : श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय बॉडी बिल्डिंग स्पर्धा झाली. यामध्ये सांगली, सातारा, कोल्हापूर येथील ४२ महाविद्यालयातील ६७ स्पर्धकांनी सहभाग घेतला. रामकृष्ण चितळे, विजय मोरे, राजेश वडाम, राहुल परीट यांनी पंच म्हणून काम पाहिले.

सुवर्णपदक विजेत्यांची निवड दोन ते पाच मार्च रोजी आंध्र युनिव्हर्सिटी विशाखापट्टणम येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ बॉडी बिल्डिंग स्पर्धेसाठी झाली. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांचे सहकार्य लाभले.

**निकाल असा :**

६० किलो : प्रतीक मगदूम (डीकेएएससी कॉलेज इचलकरंजी), आयुष शेट्टी (व्यंकटेश कॉलेज इचलकरंजी), ऋत्विक शिंत्रे (नाईट कॉलेज इचलकरंजी). ६५ किलो : तुषार शिंदे (एसीएस कॉलेज आष्टा), किरण गायकवाड (व्हीपी कॉलेज कळे), केदार सातपुते (शहाजी कॉलेज). ७० किलो : शुभम कदले (जयसिंगपूर कॉलेज), ओंकार मिसाळ (शहाजी कॉलेज), संकेत दाडगोळ (शाहू कॉलेज). ७५ किलो : प्रदीप माळी (डीकेटीई इचलकरंजी), आदित्य भुइंगडे (व्हीपी कॉलेज), अफान शेख (एलबीएस कॉलेज सातारा). ८० किलो : मयूर जाली (केडब्ल्यूसी सांगली), केदार शिंदे (डीवायपी तळसंदे), प्रथमेश घाडगे (केडब्ल्यूसी सांगली). ८५ किलो : यश कोरी (शिवराज कॉलेज गडहिंग्लज), अभिषेक भोसले (बडे कॉलेज पुनाळ), पार्थ जाधव (व्यंकटेश कॉलेज, इचलकरंजी). ८५ किलोवरील : शिवमय चौगुले (नाईट कॉलेज, इचलकरंजी), सोनू कचरे (बळवंत कॉलेज).

16 FEB 2026
सकाळ



कोल्हापूर : अखिल भारतीय पुरुष क्रॉसकंट्री स्पर्धेत उपविजेतपद पटकाविणारा शिवाजी विद्यापीठाचा संघ.

# पुरुष क्रॉसकंट्री स्पर्धेत विद्यापीठाला उपविजेतपद

कोल्हापूर, ता. १५ : रोहतक (हरियाणा) येथील महर्षी दयानंद विद्यापीठात झालेल्या अखिल भारतीय पुरुष क्रॉसकंट्री स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाने उपविजेतपद पटकाविले. देशभरातील विविध १३८ विद्यापीठांतील १२८६ खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता.

स्पर्धेत अभिषेक देवकातेने चौथा, अभिनंदन सूर्यवंशीने पाचवा, तर चैतन्य रूपनावरने १४ वा क्रमांक पटकाविला. इराप्पा ब्याडगीने ३७, प्रवीण कांबळेने ५२, तर सुमंत राजभरने ५३ वा क्रमांक मिळविला. त्यांना प्रशिक्षक प्रकुल पाटील-मांगोरे यांचे मार्गदर्शन, तर प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. शरद बनसोडे यांचे प्रोत्साहन मिळाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

16 FEB 2026

तरूण भारत

# 'सीपीआर'मध्ये स्वच्छता मोहिमेने 'व्हॅलेंटाइन डे' साजरा



कोल्हापूर : सीपीआरमधील स्वच्छता मोहिमेत सहभागी विद्यार्थी, शिक्षक, अधिकारी.

प्रतिनिधी
कोल्हापूर

छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालयात (सीपीआर) स्वच्छता मोहिम राबवत अनोख्या पद्धतीने व्हॅलेंटाईन डे साजरा करण्यात आला. समाजाप्रती वाहिलेला एक व्हॅलेंटाइन डे या ब्रीद वाक्यानुसार सीपीआर परिसराची स्वच्छता करण्यात आली. या अनोख्या उपक्रमातून समाजामध्ये जनजागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला असल्याचे अधिष्ठाता डॉ. सदानंद भिसे यांनी सांगितले.

या उपक्रमामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे छात्र, शिवाजी विद्यापीठ, शहाजी महाविद्यालय, देशभक्त रत्नाप्पा कुंभार महाविद्यालय, सायबर महाविद्यालय, महावीर महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षकांनी सहभाग घेतला. शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य सिद्धार्थ शिंदे यांनी पाहुण्याची ओळख करून दिली. यानंतर सीपीआर आवाराची स्वच्छता करत सामाजिक बांधिलकीचा एक आदर्श घालून दिला.

अधिष्ठाता डॉ. सदानंद भिसे, वैद्यकीय अधिक्षक डॉ. भूषण मिरजे, शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, यांनी मार्गदर्शन केले. सीपीआर रुग्णालयात सुरू असणाऱ्या विविध योजनांबाबत व याअंतर्गत होणाऱ्या मोफत उपचारांबाबत माहिती दिली. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. जहीर पटवेकर, अधिसेविका भिवसे, समाजसेवा अधिक्षक केदार ढेकणे, श्री. भगवान गायकवाड, स्वच्छता निरीक्षक आशीष कांबळे, विशाल घोर, सुधीर बुवा, प्रा. राधिका देसाई, रमेश्वरी गुंजीकर, अलका वडकर, शहाजी महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. विजय देठे, सुजीत मुंडे, महाराष्ट्र सुरक्षा बलाचे कर्मचारी, इतर सहकारी, अधिकारी व कर्मचारी, परिचारिका,विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

16 FEB 2026
तरुण भारत

# हरित रसायनशास्त्र हा सामाजिक विकासाचा मार्ग

## डॉ. इंद्रजित घोष : शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय रसायनशास्त्र परिषद उत्साहात

प्रतिनिधी
कोल्हापूर

हरित रसायनशास्त्र हे केवळ पर्यावरण संवर्धनाचे साधन नसून आर्थिकदृष्ट्या परवडणारा आणि सामाजिकदृष्ट्या जबाबदार विकासाचा मार्ग आहे. शाश्वत विकासासाठी संशोधन हे रसायनशास्त्राच्या सामाजिक, नैतिक जबाबदारीचे अधोरेखन आहे, असे प्रतिपादन झेल रिपब्लिक येथील व्हीएसबी– टेक्निकल ओसावा युनिव्हर्सिटीचे प्राध्यापक डॉ. इंद्रजीत घोष यांनी केले.



शिवाजी विद्यापीठात 'आधुनिक रसायनशास्त्राद्वारे शाश्वत विकास' या विषयावर आयोजित एकदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव होत्या.

डॉ. घोष म्हणाले, आपण निर्माण केलेली प्रत्येक अणुसंरचना, प्रत्येक प्रक्रिया आणि प्रत्येक उत्पादन हे भविष्यातील पिढ्यांसाठी महत्त्वाचा संदेश ठरणारे आहे, हे लक्षात घेऊन आपल्या संशोधनाच्या दिशा ठरविण्याचा हा कालखंड आहे. ऊर्जा कार्यक्षम तंत्रज्ञान, नूतनीकरणीय कच्चा माल, जैव–उत्प्रेरण, सतत प्रवाही तंत्रज्ञान आणि शाश्वत अर्थव्यवस्थेच्या संकल्पना या भविष्यातील औद्योगिक प्रगतीसाठी अत्यावश्यक ठरणार आहेत.

प्र–कुलगुरू डॉ. जाधव म्हणाल्या, आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य, सामाजिकदृष्ट्या न्याय्य आणि पर्यावरणीयदृष्ट्या संतुलित संशोधनाची आज सर्वच क्षेत्रांत आवश्यकता आहे. शाश्वत विकासाच्या पूर्ततेसाठी रसायनशास्त्राची भूमिका अधोरेखित करत ही परिषद विज्ञान, उद्योग आणि समाज यांच्यातील सेतू म्हणून कार्य करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. परिषदेचे समन्वयक डॉ. संजय कोळेकर यांनी स्वागत केले. रसायनशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. संजय चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. डॉ. संदीप संकपाळ यांनी आभार मानले.

### देशविदेशांतील नामांकित संशोधकांचे मार्गदर्शन

परिषदेत प्रा. ग्यानविटो विले (इटली), प्रा. जगदीश राजेनहळ्ळी (जर्मनी), डॉ. सचिन नानावटी (इंग्लंड), प्रा. अनंत कापडी, आयसीटी, मुंबई, डॉ. दिनेश सावंत, एनसीएल, पुणे, प्रा. व्यंकट कृष्णन, आयआयटी, मंडी आदी नामवंत शास्त्रज्ञांनी रसायनशास्त्राच्या विविध पैलूंवर मार्गदर्शन केले. परिषदेत सुमारे ३५० पेक्षा अधिक देशविदेशांतील संशोधक, शिक्षक, विद्यार्थी सहभागी झाले होते. दिवसभरात दोनशेहून अधिक शोधनिबंध सादर करण्यात आले. परिषदेच्या यशस्वितेसाठी डॉ. शंकर हंगीर्गेकर, डॉ. गजानन राशिनकर, डॉ. कल्याणराव गरडकर, डॉ. दिलीप दगडे यांनी परिश्रम घेतले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

16 FEB 2026

तरुण भारत

# म्हैसूरच्या युवा महोत्सवात शिवाजी विद्यापीठाचा डंका

## पाश्चिमात्य समूह गीत, शास्त्रीय ताल वाद्य, हिंदी वक्तृत्व, मातीकाम स्पर्धेत पटकावला प्रथम क्रमांक

प्रतिनिधी
कोल्हापूर

नवी दिल्लीतील भारतीय विश्वविद्यालय संघाच्यावतीने आयोजित म्हैसूर येथे झालेल्या दक्षिण-पश्चिम विभागीय युवा महोत्सवात शिवाजी विद्यापीठाच्या संघांनी यश मिळवले. म्हैसूरमधील शिवरात्रीश्वरा येथील जेएसएस ॲकॅडमी ऑफ हायर एज्युकेशन ॲंड रिसर्च येथे ९ ते १४ रोजी या कालावधीत हा युवा महोत्सव संपन्न झाला.



कोल्हापूर : म्हैसुर येथील विभागीय युवा महोत्सवात विविध स्पर्धेत यश मिळवलेला शिवाजी विद्यापीठाच्या संघांतील विद्यार्थी.

या महोत्सवात शिवाजी विद्यापीठाचा एकूण ६० सदस्यांचा संघ सहभागी झाला होता. महोत्सवात विद्यापीठाच्या संघांनी पाश्चिमात्य समूहगीत, शास्त्रीय ताल-वाद्य, हिंदी वक्तृत्व, मातीकाम या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत शिवाजी विद्यापीठाचा डंका पिटला. त्याचबरोबर कला विभाग सर्वसाधारण विजेतेपद व सर्वसाधारण दुसरा उपविजेतेपद विद्यापीठास प्राप्त झाले आहे.

विजेत्या संघास प्रभारी कुलगुरु प्रा. डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी प्र-कुलगुरु प्रा. डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यापीठ संघासोबत डॉ. रघुनाथ ढमकले, डॉ. टी. एम. चौगले होते. संघव्यवस्थापक म्हणून डॉ. ए. एस. बल्लाळ, व प्रा. डॉ. शिला मोहिते यांनी काम पाहिले.

### असे मिळाले यश :

पाश्चिमात्य समूहगीत : प्रथम क्रमांक, शास्त्रीय ताल-वाद्य : प्रथम क्रमांक, हिंदी वक्तृत्व : प्रथम क्रमांक, मातीकाम : प्रथम, सुगम गायन : द्वितीय, कातरकाम : द्वितीय, व्यंगचित्र : द्वितीय क्रमांक, रांगोळी : द्वितीय क्रमांक, प्रश्नमंजूषा : तृतीय क्रमांक, पाश्चिमात्य एकल गायन : तृतीय, शास्त्रीय गायन : चतुर्थ, भारतीय समूहगीत : चतुर्थ, लोकसंगीत वाद्यवृंद : चतुर्थ, पाश्चिमात्य एकल वाद्यवादन : चतुर्थ, लोकनृत्य : चतुर्थ, शास्त्रीय नृत्य : चतुर्थ, लघुनाटिका : चतुर्थ, मुकनाट्य : चतुर्थ, स्थळ चित्र : चतुर्थ, हिंदी वादविवाद : पाचवा, नकला : पाचवा.

16 FEB 2026


पुढारी

# राष्ट्रीय विवेकानंद महोत्सव आजपासून प्रारंभ

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयात दि. १६ व १७ फेब्रवारी रोजी विवेकानंद महोत्सव : शोध चैतन्याचा या राष्ट्रीय महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. उपक्रमामध्ये अभिवाचन, आयडीयाथॉन, रील फ्लिक्स, डान्स मॅजिक स्पर्धा होणार आहेत. स्पर्धांसाठी रोख पारितोषिके विजेत्यांना मिळणार आहेत. विद्यार्थी, विद्यार्थिनींसाठी मिस्टर अॅण्ड मिस विवेकानंद स्पर्धा होईल. तसेच आजी -माजी विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक कलाकौशल्यास वाव देण्यासाठी स्टुडंटस् एक्स्पो होणार आहे. विद्यार्थ्यांनी यात सहभागी व्हावे, असे आवाहन प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, डॉ. श्रुती जोशी यांनी केले आहे.

16 FEB 2026

जनप्रवास




कोल्हापूर : अखिल भारतीय पुरुष क्रॉस कंट्री राष्ट्रीय स्पर्धेत विद्यापीठाच्या संघाने उल्लेखनीय कामगिरी करत सांघिक उपविजेतेपद पटकावले.

# विद्यापीठाला क्रॉस कंट्री स्पर्धेत सांघिक यश

**जनप्रवास : कोल्हापूर**

- देशभरातील विविध १३८ विद्यापीठांच्या २८६ खेळाडूंचा सहभाग

महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहतक येथे १५ फेब्रुवारी २०२६ रोजी अखिल भारतीय पुरुष क्रॉस कंट्री स्पर्धा उत्साहात पार पडली. देशभरातील विविध १३८ विद्यापीठांच्या २८६ खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग नोंदवत उच्च दर्जाची स्पर्धात्मकता दाखवली. या प्रतिष्ठेच्या राष्ट्रीय स्पर्धेत विद्यापीठाच्या संघाने उल्लेखनीय कामगिरी करत सांघिक उपविजेतेपद पटकावले, ही संस्थेसाठी अभिमानास्पद बाब ठरली.

वैयक्तिक गटात अभिषेक देवकाते याने उत्कृष्ट धाव घेत ४ था क्रमांक मिळवला. त्यापाठोपाठ अभिनंदन सूर्यवंशी याने ५ वा क्रमांक पटकावला. चैतन्य रुपनावर याने १४ वा क्रमांक मिळवत संघासाठी महत्त्वपूर्ण कामगिरी केली. खेळाडूंमध्ये इराप्पा ब्याडगीने ३८ वा क्रमांक मिळवला, प्रवीण कांबळे याने ५२ वा क्रमांक, तर सुमंत राजभर याने ५३ वा क्रमांक प्राप्त केला. सर्व खेळाडूंच्या एकत्रित कामगिरीमुळे विद्यापीठाला सांघिक उपविजेतेपद मिळवले.

संघाला प्रशिक्षक प्रकुल पाटील मांगोरे यांचे तांत्रिक मार्गदर्शन लाभले. संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. के. बी. बेल्लद यांनी जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्रकुलगुरु डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे प्रोत्साहन ब ही क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाखाली पार पडली.